क्र.२/नसथि/प्रशासक/ ०२/२०२३-२०२४
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :-१५ सप्टेंबर २०२३

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

प्रशासक सभा क्रमांक - ०२/२०२३-२०२४

स्थायी समिती सभा कामकाजाकरिता प्रशासक सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना स्थायी समितीची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, स्थायी समितीच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **सोमवार दि. १८/०९/२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

परिशिष्ठ

१. मागील स्थायी समिती सभा दि.११/०९/२०२३ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडील दि.०३/०८/२०२३ ते दि.०९/०८/२०२३, दि.१०/०८/२०२३ ते १६/०८/२०२३, आणि दि.१७/०८/२०२३ ते दि.२४/०८/२०२३ अखेरचे आगीचे विवरण पत्र अवलोकनी घेणे.

३. महानगरपालिका क्षेत्रातील यशवंतनगर टाकी ते चैत्रबन चौक लगत हेड क्वॉर्टर्स पाणी योजना संप (साठवण हौद) पर्यंत नविन ग्रॅव्हीटी मेन पाईप लाईन टाकणे अंदाजपत्रक र.रु.४३,१७,८९६/- मात्रचे कामी रितसर निविदा मागविणेत आलेल्या होत्या. सदर निविदेस दोन वेळा मुदतवाढ देवूनही विहित मुदतीत एकच निविदा प्राप्त झाल्याने, सदर निविदेमधील निविदाधारक श्री.जोवद एस शेख,मिरज यांचा दर एस्टीमेट पेक्षा ४.९५% जादाचा असलेने, निविदाधारक श्री.शेख यांचेशी वाटाघाटीअंती निविदा खर्चाच्या ३.८०४% जादा दराने कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणारे र.रु.४४,८२,१५१/- मात्रचे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.१३/०९/२०२३ चे विषयपत्र.**

४. महानगरपालिका क्षेत्रातील माळबंगला जलशुद्धीकरण केंद्र मुख्य संतुलन टाकी पासून यशवंतनगर पंप हाऊस संपपर्यंत ३५०एम.एम.व्यासाची डी.आय.निवन मेन पाईप लाईन टाकणे अंदाजपत्रक र.रु.१,३६,५८,४९७/- मात्रचे कामी रितसर निविदा मागविणेत आलेल्या होत्या. सदर निविदेस दोन वेळा मुदतवाढ देवूनही विहित मुदतीत एकच निविदा प्राप्त झाल्याने, सदर निविदेमधील निविदाधारक श्री.जोवद एस शेख,मिरज यांचा दर एस्टीमेट पेक्षा ५४.५४% जादाचा असलेने, निविदाधारक श्री.शेख यांचेशी वाटाघाटीअंती सुधारीत खर्चाच्या ९.१९२% जादा दराने म्हणजे मुळ निविदा खर्चाच्या तुलनेत ५०.४०७% जादा दराने कामगिरी करून घेणेस व त्याकामी येणारे र.रु.२,०५,४३,४४३/- मात्रचे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.१३/०९/२०२३ चे विषयपत्र.**

५. प्रभाग क्र.४ मिरज येथील अमननगर रस्ता क्र.१ ते सुभाषनगर रोडपर्यंत १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज पाईप लाईन टाकणे व चेंबर्स बांधणे अंदाजित र.रु.४७,९६,८३४/- मात्रचे कामगिरी कामी रितसर जाहिर निविदा मागविणेत आल्या होत्या. सदरची निविदा मधील पहिला लिफाफा उघडल्यानंतर सदर प्रस्तावास मा.स्थायी समितीची मान्यता नसलेचे निदर्शनास आलेने, सदर निविदेतील लिफाफा क्र.२ उघडणेस व पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण करणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (जलनि:सारण विभाग,मिरज) यांचे दि.१५/०९/२०२३ चे विषयपत्र.**

६. राष्ट्रीय नदीकृती योजना (NRAP) शेरीनाला व कवलापुर पंपींग स्टेशन येथे नव्याने अॅक्वा कंपनीचे २७५ व २०० अश्वशक्तीचे सबमर्सिबल पंप बसविणे अंदाजपत्रक र.रु.७३,८३,७४४/- मात्रचे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये रितसर जाहिर निविदा प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (जलनि:सारण विभाग) यांचे दि.१५/०९/२०२३ चे विषयपत्र.**

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे मान्यतेने

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२३-२४ दिनांक :- १८/०९/२०२३ चे इतिवृत्त

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची स्थायी समिती प्रशासक सभा क्र.०२ दि.१८/०९/२०२३ रोजी महापालिकेच्या पद्मभूषण डॉ.वसंतराव दादा पाटील सभागृह,सांगली येथे सकाळी ११.३० वाजता आयोजित करणेत आलेली होती. सदर प्रशासक स्थायी समिती सभेकरीता खालील अधिकारी उपस्थित होते.

अ. क्र.	उपस्थितांची नावे	अ. क्र.	उपस्थितांची नावे
१.	श्री.सुनिल पवार – प्रशासक	२.	श्री.संजय ओहोळ – अतिरिक्त आयुक्त,मिरज
३.	श्री.राहुल रोकडे – उपायुक्त,सांगली	४.	श्रीम.स्मृती पाटील – उपायुक्त,मिरज
५.	श्री.पृथ्वीराज चव्हाण –शहर अभियंता	६.	श्री.शिरिष धनवे – मुख्य लेखापरिक्षक
७.	श्री.सुशिलकुमार केंबळे - लेखापाल	८.	श्री.वैभव पाटील - वैद्यकिय आरोग्याधिकारी
९.	श्री.चिदानंद कुरणे - कार्यकारी अभियंता, पा.पु./ जल.वि.	१०.	श्री.राजेंद्र काकडे- नगररचनाकार,मिरज/कुपवाड
११.	श्री.विनायक शिंदे – प्रशासन अधिकारी (आस्था.)	१२.	श्री.अशोक माणकापुरे- प्रशासकीय अधिकारी
१३.	श्री.नकुल जकाते – सिस्टिम मॅनेजर	१४.	श्री.नितीन शिंदे- मालमत्ता व्यवस्थापक / कर निर्धारक,संकलक
१५.	श्री.तेजस शहा - ज्युनि.इंजिनियर वर्कशॉप,सांगली	१६.	श्री.विनायक जाधव-ज्युनि.इंजिनियर वर्कशॉप,मिरज
१७.	श्री.सचिन सागावकर – सहा.आयुक्त,प्र.स.क्र.२	१८.	श्रीम.उज्वला शिंदे– सहा.आयुक्त,प्र.स.क्र. ३
१९.	श्री.अनिस मुल्ला – सहा.आयुक्त,प्र.स.क्र.४	२०.	श्री.आप्पा हलकुडे - नगर अभियंता,सांगली
२१.	श्री.सुनिल पाटील - विशेष कार्यकारी अधिकारी,पा.पु.वि.	२२.	श्री.भगवान पांडव - नगर अभियंता मिरज / ना.दा.नि.कक्ष
२३.	श्री.धनंजय हर्षद - जनसंपर्क / विधी अधिकारी	२४.	श्री.रविंद्र ताटे – आरोग्याधिकारी,मिरज
२५.	श्री.सुनिल माळी – अग्निशमन अधिकारी	२६.	श्री.शंकर भंडारे – ग्रंथपाल,सांगली
२७.	श्री.वैभव वाघमारे – नगररचनाकार,सांगली	२८	श्री.जेलर - क्रिडा अधिकारी
२९.	श्री.गुजर – पर्यावरण अभियंता	३०.	श्री.रंगराव आठवले - प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग
३१.	श्री.अमर चव्हाण – विद्युत अभियंता		

महापालिका सचिव यांनी सभेच्या सुरुवातीला मा.प्रशासक व सर्व अधिकारी यांचे स्वागत करुन, सभेच्या कामकाजास मा.प्रशासक यांच्या आदेशाने सुरुवात केली.

विषय क्र. ०१ - मागील स्थायी समिती सभा दि.११/०९/२०२३ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

प्रशासक - मागील सभेतील कार्यवृत्त कायम करणेत येत आहे.

विषय क्र. ०२ - आगीचे विवरणपत्रे अवलोकनी घेणे.

प्रशासक - किती आगी लागल्या.

अग्निशमन अधिकारी - ०९ ठिकाणी किरकोळ स्वरुपाच्या आगी लागलेल्या होत्या.

उपायुक्त - टॉवरच काय झाल.

अग्निशमन अधिकारी - २०० टॉवरनां नोटीस दिलेली होती. कोर्ट मॅटर झाले आहे.

प्रशासक - १८९ मोबाईल टॉवर परमिशन पेंडीग आहेत.त्यावर लवकर निर्णय घ्यावा.

अग्निशमन अधिकारी - फायर प्लॅननुसार मान्यता देणेचे सुरु आहे.

प्रशासक - महापालिका क्षेत्रात २२ मीटर पेक्षा उंच किती बिल्डींग आहेत.

नगररचनाकार - दोन बिल्डींग आहेत.

प्रशासक - अग्निशमन विभागाच्या ऑडिट रिर्पोटच काय झाले.

अग्निशमन अधिकारी - अद्यान रिर्पोट मिळालेला नाही.

प्रशासक - विषय मंजुर

विषय क्र. ०३ - यशवंतनगर टाकी ते चैत्रबन चौक लगत हेड क्वॉर्टर्स पाणी योजना संप (साठवण हौद) पर्यत नविन ग्रॅव्हीटी मेन पाईप लाईन टाकणे अंदाजपत्रक र.रु.४३,१७,८९६/- मात्रचे कामी निविदा दरास मान्यता देणे.

प्रशासक - वाटाघाटीनंतर सुधारीत दराने मंजुरी देणेत आलेली आहे. विषय मंजूर

विषय क्र. ०४ - माळबंगला जलशुद्धीकरण केंद्र मुख्य संतुलन टाकी पासून यशवंतनगर पंप हाऊस संपपर्यत ३५०एम.एम.व्यासाची डी.आय.निवन मेन पाईप लाईन टाकणे अंदाजपत्रक र.रु.१,३६,५८,४९७/- मात्रचे कामी निविदा दरास मान्यता देणे.

प्रशासक - वाटाघाटीनंतर सुधारीत दराने मंजुरी देणेत आलेली आहे. विषय मंजूर

विषय क्र. ५ - प्रभाग क्र.४ मिरज येथील अमननगर रस्ता क्र.१ ते सुभाषनगर रोडपर्यत १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज पाईप लाईन टाकणे व चेंबर्स बांधणे अंदाजित र.रु.४७,९६,८३४/- मात्रचे कामी प्राप्त निविदा मधील लिफाफा क्र.०२ उघडणेस मान्यता देणे.

प्रशासक - अनावधानाने चुका कशा होतात. यापुढे अशा चुका होता कामा नये अशी समज देणेत येत आहे. दुसरा लिफाफा उघणेस मान्यता देणेत येत आहे.

विषय क्र.६ - राष्ट्रीय नदीकृती योजना (NRAP) शेरीनाला व कवलापुर पंपींग स्टेशन येथे नव्याने अॅक्वा कंपनीचे २७५ व २०० अश्वशक्तीचे सबमर्सिबल पंप बसविणे अंदाजपत्रक र.रु.७३,८३,७४४/- मात्रचे कामी निविदा मागविणेस मान्यता देणे

प्रशासक - विषय मंजुर

येणेप्रमाणे सभेचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर मा.प्रशासक यांनी सभा संपलेचे जाहिर केले.

दिनांक :- १८/०९/२०२३

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ३३ **दिनांक :- १९/०९/२०२३**

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (जलनि:सारण विभाग) यांचे दि.१५/०९/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

राष्ट्रीय नदीकृती योजना (NRAP) शेरीनाला व कवलापुर पंपींग स्टेशन येथे नव्याने ॲक्वा कंपनीचे २७५ व २०० अश्वशक्तीचे सबमर्सिबल पंप बसविणे अंदाजपत्रक र.रु.७३,८३,७४४/- मात्रचे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये रितसर जाहिर निविदा प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधीत विभागाने विहित पद्धतीने करावी.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

जलनि. सपना अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ३२ **दिनांक :- १८/०९/२०२३**

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (जलनि:सारण विभाग,मिरज) यांचे दि.१५/०९/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

प्रभाग क्र.४ मिरज येथील अमननगर रस्ता क्र.१ ते सुभाषनगर रोडपर्यत १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज पाईप लाईन टाकणे व चेंबर्स बांधणे अंदाजित र.रु.४७,९६,८३४/- मात्रचे कामगिरी कामी रितसर जाहिर निविदा मागविणेत आल्या होत्या. सदरची निविदा मधील पहिला लिफाफा उघडल्यानंतर सदर प्रस्तावास मा.स्थायी समितीची मान्यता नसलेचे निदर्शनास आलेने, लिफाफा क्र.२ उघडणेस मान्यता देणेकामीच्या प्रस्तावानुसार सदर निविदेतील लिफाफा क्र.२ उघडणेस मान्यता देणेत येत आहे.

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधीत विभागाने विहित पद्धतीने करावी.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

उपायुक्त (जलनि:सारण विभाग)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ३१ **दिनांक :-** १९/०९/२०२३

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.१३/०९/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रातील माळबंगला जलशुद्धीकरण केंद्र मुख्य संतुलन टाकी पासून यशवंतनगर पंप हाऊस संपपर्यत ३५० एम.एम.व्यासाची डी.आय.निवन मेन पाईप लाईन टाकणे अंदाजपत्रक र.रु.१,३६,५८,४९७/- मात्रचे कामी रितसर निविदा मागविणेत आलेल्या होत्या. सदर निविदेस दोन वेळा मुदतवाढ देवूनही विहित मुदतीत एकच निविदा प्राप्त झाल्याने, सदर निविदेमधील निविदाधारक श्री.जोवद एस शेख,मिरज यांचा दर एस्टीमेट पेक्षा ५४.५४% जादाचा असलेने, निविदाधारक श्री.शेख यांचेशी वाटाघाटीअंती सुधारीत खर्चाच्या ९.१९२% जादा दराने म्हणजे मुळ निविदा खर्चाच्या तुलनेत ५०.४०७% जादा दराने कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणारे र.रु.२,०५,४३,४४३/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधीत विभागाने विहित पद्धतीने करावी.

पाणी पुरवठा अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ३० **दिनांक :- १९/०९/२०२३**

विषय क्रमांक :- ०३

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.१३/०९/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रातील यशवंतनगर टाकी ते चैत्रबन चौक लगत हेड क्वॉर्टर्स पाणी योजना संप (साठवण हौद) पर्यत नविन ग्रॅव्हीटी मेन पाईप लाईन टाकणे अंदाजपत्रक र.रु.४३,१७,८९६/- मात्रचे कामी रितसर निविदा मागविणेत आलेल्या होत्या. सदर निविदेस दोन वेळा मुदतवाढ देवूनही विहित मुदतीत एकच निविदा प्राप्त झाल्याने, सदर निविदेमधील निविदाधारक श्री.जोवद एस शेख,मिरज यांचा दर एस्टीमेट पेक्षा ४.९५% जादाचा असलेने, निविदाधारक श्री.शेख यांचेशी वाटाघाटीअंती निविदा खर्चाच्या ३.८०४% जादा दराने कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणारे र.रु.४४,८२,१५१/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधीत विभागाने विहित पद्धतीने करावी.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

पाणीपुरवठा विभाग

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- २९ **दिनांक :- १९/०९/२०२३**

विषय क्रमांक :- ०२

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडील दि.०३/०८/२०२३ ते दि.०९/०८/२०२३, दि.१०/०८/२०२३ ते १६/०८/२०२३, आणि दि.१७/०८/२०२३ ते दि.२४/०८/२०२३ अखेरचे आगीचे विवरण पत्रे अवलोकनी घेवून परत पाठविणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी.

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०२/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- २८ **दिनांक :-** १८/०९/२०२३

विषय क्रमांक :- ०१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.११/०९/२०२३ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.०१ ते ठराव क्र.२७ हे वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

स्थायी समिती विशेष.

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका